



रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

**ता. पलूस, जि. सांगली**

**दिनांक : ११ जून २०२१**

## अहवाल

**मराठी विभाग आयोजित**

## साने गुरुजी स्मृतिदिन सोहळा

शुक्रवार दिनांक ११ जून २०२१ रोजी पांडूरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांच्या ७१ व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने 'साने गुरुजी : व्यक्तित्व, जीवन आणि वाङ्मय' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेच्या, एस.एस. जी. एम महाविद्यालय कोपरगाव येथील प्रा.डॉ. कैलास महाले हे प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रित होते. यावेळी त्यांनी साने गुरुजींच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. 'साने गुरुजींनी मराठी मनावर नैतिकतेचा संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सुसंस्कृत राष्ट्र निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारा वाङ्मयीन प्रयत्न साने गुरुजींनी आपल्या साहित्यलेखनातून केला. साने गुरुजी हे खऱ्या अर्थाने कामगार-किसान लढ्यात सहभागी होणारे लोकशिक्षक, समाजशिक्षक होते.' असे मत डॉ. महाले यांनी मांडले.

अध्यक्षिय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम म्हणाले, 'साने गुरुजी यांच्या संवेदनशील, सहृदयी स्वभावामागे त्यांच्या आईचे खूप मोठे संस्कार होते. खरा तो एकची धर्म प्रार्थना लिहणाऱ्या साने गुरुजींनि खऱ्या अर्थानि भारतीय मुलांना आदर्श राष्ट्रनिर्मितीचे संस्कार दिले. साम्यवादी विचारांच्या साने गुरुजींनी आंतरभारती सारख्या संस्थेतून समग्र देशाच्या संस्कृतीचा अंतरमिलाप करण्याचा एक मोठा प्रयत्न केला आहे.'

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. आभार विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी मानले, तर सूत्रसंचलन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले. तंत्रसहाय्य प्रा. दिनेश ससाणे यांनी केले. सदर ऑनलाईन व्याख्यानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, उपप्राचार्य डॉ. व्हि. बी. पाटील आणि डॉ. काकासाहेब भोसले, सर्व अध्यापक, सेवकवृंद, विद्यार्थी, उपस्थित होते.

**निष्पत्ती :** उपस्थितांना साने गुरुजींच्या जीवित कार्याची महती कळाली.

**लाभार्थी :** ४२




मराठी विभाग प्रमुख,
विभागप्रमुख
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

प्राचार्य